बंगळूरूचा विजयासह फायनलमध्ये प्रवेश

चंदीगड- रॉयल चॅलेंज बंगळूरूने आयपीएल २०२५ च्या फायनलमध्ये दिमाखदार प्रवेश केला आहे. बंगळूरूने पंजाबचा मोठ्या फरकाने पराभव करत फायनलमध्ये आपली जागा पक्की केली आहे. पंजाबला आधी १०१ धावांवर बंगळुरूने रोखले. पंजाबने दिलेल्या माफक लक्षाचा पाठलाग करताना बंगळूरूला जास्त श्रम घ्यावे लागले नाही. त्यांनी सहज विजय मिळवला. बंगळूरूने आक्रमक सुरुवात केली. विराट कोहली १२ चेंडूत १२ धावा काढून बाद झाला. मयंक अगरवाल हा ही १३ चेंडूत १९ धावा करून बाद झाला. फिल सॉल्टने आक्रमक खेळी करत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याला कॅप्टन रजत पाटीदारची साथ मिळाली. त्याने दहाव्या ओव्हर्समध्ये शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत बंगळूरूला विजय मिळवून दिला. बंगळूरूने १० ओव्हर्स आणि ८ विकेट राखून दणदणीत विजय मिळवला. फिल सॉल्टने २७ बॉलमध्ये ५६ धावा ठोकल्या.

कॉलीफायर वनमध्ये बंगळूरू विरुद्ध पंजाब यांच्यात सामना रंगला. बंगळूरूने टॉस जिंकत पंजाबला बॅटींग करण्याचे निमंत्रण दिले. बंगळूरूचा हा निर्णय अगदी बरोबर ठरला. पंजाबच्या एकाही फलंदाजाला मैदानात ठाम पणे उभे राहाता आले नाही. त्यांचा डाव अगदी पत्त्याच्या बंगल्या प्रमाणे कोसळला. पंजाबला २० ओव्हर्स ही पूर्ण खेळता आल्या नाहीत. पंजाबचा डाव १४.१ ओव्हर्समध्ये अवघ्या १०१ धावांत गडगडला. पंजाबकडून मार्कस स्टोइनिस याने सर्वाधिक २६ धावा केल्या. ओमरझाई आणि प्रभसिमरन सिंग यांनी प्रत्येकी १८ धावा केल्या. यांच्या शिवाय एकाही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. पंजाबच्या फलंदाजांमध्ये बाद होण्याची जणू स्पर्धा लागली होती. प्रियांश आर्य सात धावा काढून बाद झाला. त्याच्या नंतर जॉश इंग्लिस ४, श्रेयस अय्यर २, नेहल वाधेरा ८, शशांक सिंग ३, मुशीर खान ०, हरप्रीत ब्रार ४ धावा केल्या. यांची अवस्था तू चल मै आया अशीच झाली होती. यांनी फक्त मैदानावर हजेरी लावण्याचे काम केले. संपूर्ण डावात फक्त चार सिक्स लगावले गेले. बंगळूरूच्या बॉलर्सनी पंजाबच्या बॅट्समनवर पहिल्यापासून अंकुश ठेवला होता. त्यांना डोक वर काढण्याची संधी बंगळूरूच्या बॉलर्सनी शेवटपर्यंत दिलीच नाही. जॉश हेझलवू याने २१ धावा देत ३ विकेट घेतल्या. तर सुयश शर्मा याने ३ ओव्हर्समध्ये अवघ्या १७ धावा देत ३ विकेट घेतल्या. तर यश दयालने दोन जणांना बाद केले. भुवनेश्वर कुमार आणि रोमारियो शेफर्ड यांनी प्रत्येक एक विकेट घेतली.

लीलाबाई कदम यांचे निधन

भानसहिवरा (वार्ताहर)- नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथील लीलाबाई सदाशिव कदम (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, पुतणे, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष कदम व बाळासाहेब कदम यांच्या त्या मातोश्री होत.

वकील साहेब, तुम्हालाही मुलीबाळी असतील शिंतोडे उडवू नका

वैष्णवीचे वडील पत्रकार परिषदेत ढसाढसा रडले

पुणे (प्रतिनिधी)- वैष्णवीच्या चॅटिंग संदर्भात कोणतीहीपुरावेशीही कल्पना मला दिलेली नाही. त्यावर कोणतेही भाष्य झालेले नाही.याच्या माध्यमातून त्यांनी माझ्या मुलीच्या चारित्र्यावर संशय घेतला आहे.हगवणे कुटुंबियांनी केलेले कृत्य आणि मुलीचा घेतलेला बळी याला वेगळीकलाटणी देण्यासाठी आणि गुन्हा लपविण्यासाठी त्यांच्या वकीलाने असे विधानकेले आहे, असा आरोप वैष्णवीचे वडील आनंद कस्पटे यांनी पत्रकार परिषदेतकेला. यावेळी कस्पटे यांना आपले अश्रू आवरता आले नाहीत.

आनंद कस्पटे म्हणाले, आरोपीचे वकील पूर्णपणे चुकीचे बोलले आहेत. मृत्यू झालेल्या मुलीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे वकीलाला शोभत नाही. हगवणे कुटुंबियांनी केलेले कृत्य आणि मुलीचा घेतलेला बळी याला वेगळी कलाटणी देण्यासाठी आणि गुन्हा लपविण्यासाठी त्यांच्या वकीलाने असे विधान केलेआहे. पतीने कानाखाली मारले म्हणजे छळ नाही, असे वकीलाचे म्हणणे हास्यास्पद आहे. याचा न्यायनिवाडा कोर्टच करेल. मुलीवर काहीही आरोप करीतआहेत, शिंतोडे उडवत आहेत. तुम्हालाही मुलीबाळी आहेत. माझी मुलगी तरगेलेलीच आहे. माझ्या मृत झालेल्या मुलीवर वाईट बरळू नका, असे वकीलालासुनावत कस्पटे यांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

कस्पटे म्हणाले, माझ्या मुलीला तर मी मोबाईल दिला होता. मात्र, त्यांच्या मागणीनुसार आरोपी जावयालाही दीड लाख रूपयांचा मोबाईल दोन-तीन महिन्यांपूर्वी दिला होता. त्याचे बीलही माझ्याकडे आहे. त्याचा हप्ताही मी भरत आहे. ते हुंडा घेतला नाही म्हणतात. ते चुकीचे आहे. त्यांना मी लग्नात एमजी हेक्टर कार बुक केल्याची ५० हजार रूपयांची पावती आहे.

मात्र,त्यांनी माझ्याशी वादावादी केली. ही गाडी दिली तर मी पेटवून देईन. मला फॉर्च्युनरच पाहिजे, असा तगादा लावला. त्यानंतर मी लग्नात ती कार दिली.त्यांच्याकडे कोणत्याही पाच गाड्या नाहीत. केवळ एकच फोर्ड मोटर आहे. मीदिलेली फॉर्च्युनर मागून घेतली आहे.

बाळासाठी तीन दिवस पाठपुरावा

नीलेश चव्हाणकडे बाळ मागण्यासाठी तीन दिवस आम्ही पाठपुरावा करीत होतो. पण दिले नाही. राजेंद्र हगवणेचे मोठे बंधू जयप्रकाश हगवणे यांनी उत्तम बहिरटयांना फोन केला आणि बाळाला घेऊन जाण्यास सांगितले. बाळाची खूप हेळसांड होत आहे. ते रडत आहे. त्याचा व्यवस्थित सांभाळ होणार नाही, असे सांगितले.त्यानंतर भाऊ मोहन कस्पटे आणि मेहुणे उत्तम बहिरट हे जयप्रकाश हगवणे यांच्या घरी गेले. ते आणि त्यांच्या मुलीसह मोहन कस्पटे आणि उत्तम बहिरटहे बाळाला आणण्यासाठी वारजे येथे नीलेश चव्हाणच्या घरी गेले. तेथे चव्हाण याने जयप्रकाश यांना पिस्तुलाचा धाक दाखवला. तुम्ही कोण, तुम्हाला आणि इतरांना ओळखत नाही. तुमचा काय संबंध, तुम्ही आजोबा असाल पण मी तुम्हाला पाहिलेले नाही, अशी भाषा वापरली, असेही ते म्हणाले.

हगवणेंनी मुलीची दोन लग्ने मोडली

हगवणे कुटुंबाने मुलीला सतत टॉर्चर केले. लग्नात उभे राहणार नाही, लग्नमोडून टाकेल, अशी धमकी दिली होती. अशीच दोन लग्ने त्यांनी मोडली. हे लग्नजबरदस्तीने करावे लागले. त्यामुळे लग्नात सोने-चांदी, गाडी, चांदीचे ताट,अशा त्यांच्या वेगवेगळ्या मागण्या मी पूर्ण केल्या. माझ्या मुलीचे दोनलग्न मोडण्यासाठी हगवणे कुटुंबियच कारणीभुत होते. त्याचा लवकरच उलगडाहोईल. बाळाला घेऊन जाणारा नीलेश चव्हाणही या कटात सामील आहे, असेही तेम्हणाले.

मामा सुपेकरांच्या जीवावर काहीही करू शकतो

पोलीस महानिरीक्षक जालींदर सुपेकर या मामाच्या जीवावर आम्ही काहीही करू शकतो, अशी धमकी हगवणे कुटुंबाकडून दिली जात होती. दोन कोटी दिले नाहीत म्हणून मला धमकी देऊन गेले होते. लग्न ठरवातानाही त्यांनी मामाचे नाव सांगितले होते. त्यांच्या परिचय पत्रात मामा म्हणून जालींदर सुपेकर यांचे नाव आहे. वेळोवेळी ते मामाचे नाव घेत असत, असेही ते म्हणाले.

आता प्रत्येक घराचा असेल खास डिजिटल आयडी

मुंबई- आधार कार्डाद्वारे ओळख आणि एनपीसीआय द्वारे डिजिटल पेमेंट सोपे केल्यानंतर, आता सरकार आणखी एक मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. आता प्रत्येक पत्त्याला एक युनिक डिजिटल आयडी मिळू शकतो. ज्याप्रमाणे आधार क्रमांक प्रत्येक नागरिकाच्या ओळखीसाठी आवश्यक बनला, त्याचप्रमाणे ही डिजिटल ड्रेस आयडी देशातील प्रत्येक घर आणि ठिकाणाची ओळख सोपी आणि अचूक बनवण्यास मदत करेल.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, सरकार एक अशी प्रणाली आणण्याची योजना तयार तरत आहे, ज्यात प्रत्येक पत्त्याला एक युनिक डिजिटल आयडी दिला जाईल. यामुळे सरकारी सेवा आणि पार्सलसारख्या डिलिव्हरी अधिक जलद आणि योग्य पद्धतीने करता येतील.

सध्या देशात पत्त्यांबाबत कोणतीही निश्चित प्रणाली किंवा फॉरमॅट नाही. तसेच, एखाद्याचा पत्ता डेटा कोण ठेवतंय आणि त्याचा काय वापर केला जातो, हे देखील निश्चित नाही. अनेकदा कंपन्या ही माहिती लोकांच्या परवानगीशिवाय शेअर करतात. हे थांबवण्यासाठी, सरकार आता अशी प्रणाली बनवत आहे जिथे तुमच्या परवानगीशिवाय तुमचा पत्ता कोणीही वापरू शकणार नाही.

का आहे गरज?

ऑनलाइन शॉपिंग, फूड डिलिव्हरी आणि कुरियर सेवा जितक्या वेगाने वाढल्या आहेत, तितकीच चुकीचा किंवा अपुरा पत्ता ही एक मोठी समस्या बनली आहे. गाव असो किंवा शहर, अनेक ठिकाणी पत्ते एखाद्या खुणेने किंवा स्थानिक नावाने लिहिले जातात, जे प्रमाणित नाहीत आणि स्पष्टही नाहीत. यामुळे डिलिव्हरीमध्ये उशीर होतो आणि गोंधळही निर्माण होतो. एका अभ्यासानुसार, पत्त्यांच्या या गडबडीमुळे देशाला दरवर्षी सुमारे १० ते १४ अब्ज डॉलर, म्हणजेच जीडीपीच्या सुमारे ०.५% नुकसान होते.

काय बदल होईल?

सरकार डिजिटल ड्रेस नावाचा एक नवीन फ्रेमवर्क (चौकट) तयार करत आहे, ज्यात पत्ता कसा लिहावा, कसा शेअर करावा आणि कोणत्या अटींसह त्याचा वापर केला जावा हे निश्चित केले जाईल. या प्रणालीद्वारे, कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मला तुमचा पत्ता हवा असल्यास, त्यांना तुमची परवानगी घ्यावी लागेल.

आषाढी एकादशीला वाहनांना टोलमाफी

मुंबई- आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली होती. त्याविषयीची अधिक माहिती प्रसार माध्यमांना आज देतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून घ्यावे तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोल मध्ये सवलत दिली जाईल असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. गतवर्षीप्रमाणे याहीवर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीएक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्याना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिंड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून महिला कॅडेट्सची पहिली तुकडी पदवीधर

पुणे (प्रतिनिधी)- भारतीय सशस्त्र दलांमधील महिलांसाठी एका ऐतिहासिक क्षणाची नोंद करत, राष्ट्रीय संरक्षण अकादमी, पुणे येथून महिला कॅडेट्सची पहिली तुकडी गुरुवारी, २९ मे २०२५ रोजी पदवीधर झाली आहे. १४८ व्या एनडीए अभ्यासक्रमाच्या दीक्षांत समारंभात एकूण ३३९ कॅडेट्सना पदवी प्रदान करण्यात आली, ज्यात १७ महिला कॅडेट्सचा समावेश आहे. दरम्यान, आज(शुक्रवार) या १४८ व्या तुकडीची पासिंग आउट परेड (पीओपी) होणार आहे. या ऐतिहासिक परेडचे समीक्षण अधिकारी भारतीय सैन्याचे माजी प्रमुख आणि सध्या मिझोरमचे राज्यपाल असलेले जनरल विजय कुमार सिंह (निवृत्त) असतील. अवॉर्ड विजेती कॅडेट श्रिती दक्ष ही पहिली गर्ल्स कॅडेट बनली असून, एनडीएच्या इतिहासात तिने आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) मधून उत्तीर्ण झालेल्या १७ महिला कॅडेट्सना गुरुवारी झालेल्या पदवीप्रदान समारंभात दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी देण्यात आली. एनडीएच्या १४८व्या बॅचचा पदवीप्रदान समारंभ गुरुवार, २९ मे रोजी सकाळी ११ वाजता मेजर जनरल हबीबुल्ला सभागृहात पार पडला. समारंभाला गोरखपूरच्या दीनदयाळ उपाध्याय विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. पूनम टंडन मुख्य पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. एनडीएचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल गुरचरणसिंह, डेप्युटी कमांडंट सरताज बेदी, प्राचार्य ओमप्रकाश शुक्ला आणि विविध फॅकल्टी प्रमुखही व्यासपीठावर उपस्थित होते. बीएससी (इ.डळ.) मध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कॅडेट लकीकुमार याला सिल्व्हर मेडल आणि चीफ ऑफ आर्मी स्टाफ ट्रॉफी देण्यात आली. बीएससी (कॉम्प्युटर सायन्स) मध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या कॅडेट प्रिन्सकुमारसिंह कुशवाह याला सिल्व्हर मेडल आणि चीफ ऑफ नेव्हल स्टाफ ट्रॉफीने सन्मानित करण्यात आले. बी.ए. मध्ये प्रथम क्रमांक मिळवणारी महिला कॅडेट श्रिति दक्ष हिला सिल्व्हर मेडल आणि चीफ ऑफ एअर स्टाफ ट्रॉफी देण्यात आली. बी.टेक मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कॅडेट उदयवीर सिंह नेगी याला सिल्व्हर मेडल आणि सीआयएससी ट्रॉफीने गौरवण्यात आले. पदवी प्राप्त करणाऱ्यांमध्ये विज्ञान शाखेतील ८४, कॉम्प्युटर सायन्स शाखेतील ८५ आणि कला शाखेतील ५९ कॅडेट्स आहेत. यासोबतच, नेव्ही आणि एअर फोर्समधील बी.टेक शाखेच्या १११ कॅडेट्सना तीन वर्षांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळाले आहे. या नेव्ही आणि एअर फोर्स कॅडेट्सना त्यांच्या संबंधित अकादमींमधील (इंडियन नेव्हल अकादमी आणि एअर फोर्स अकादमी) एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर पदवी दिली जाईल.

शैक्षणिक कामगिरीमध्ये, पहिल्या महिला तुकडीतील डिव्हिजन कॅडेट कॅप्टन श्रीती दक्ष हीने कला शाखेत प्रथम येण्याचा मान मिळवला, त्या या तुकडीतून शैक्षणिक टॉपर ठरल्या. विज्ञान शाखेत कॅडेट लकी कुमार, कॉम्प्युटर सायन्स शाखेत बटालियन कॅडेट कॅप्टन प्रिन्स कुमार सिंग कुशवाह आणि बीटेक शाखेत अकॅडमी कॅडेट कॅप्टन उदयवीर सिंग नेगी यांनी आपापल्या शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. या वर्षी उत्तीर्ण होणाऱ्या तुकडीमध्ये १७ मित्र देशांचे कॅडेट्स देखील होते.

प्रा. डॉ. पूनम टंडन यांनी सर्व पदवीधर कॅडेट्सचे अभिनंदन केले आणि हा टप्पा भविष्यातील गौरवशाली कारकिर्दीचा पाया ठरेल अशी आशा व्यक्त केली.

माऊली आषाढी पालखी नियोजन सोहळ्याची अंतिम बैठक

नेवासा (शहर प्रतिनिधी)- ज्ञानेश्वरी लिखानस्थान संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी श्रीक्षेत्र नेवासा येथून देहू, आळंदी, त्रिंबकेश्वर प्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर माऊली आषाढी पालखी सोहळा निघणार आहे. या सोहळ्याच्या नियोजनाची अंतिम बैठक विठ्ठल आश्रम गंगापूर येथील रामभाऊ महाराज राऊत व देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या सभामंडपात माऊली पालखी सोहळा नियोजन बैठक झाली. बैठकीसाठी महाराज मंडळी व दिंडी चालक उपस्थित होते.

राम महाराज झिंजुर्के यांनी प्रास्ताविकात पालखी सोहळा मार्ग, मुक्कामाचे ठिकाण, वारीची, किर्तनाची, भजनाची, दिंडीतील सहभागी वारकऱ्यांसाठी नियमावली व

सोहळ्याची रुपरेषा सांगितली.

देविदास महाराज म्हस्के म्हणाले, ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या रुपाने वारकरी संप्रदायाची पायाभरणी येथे केली. या पवित्र तीर्थक्षेत्रापासून पंढरपूरपर्यंत देहू आळंदी प्रमाणेच दिंड्यांना समाविष्ट करत माऊलीचा पालखी सोहळा या वर्षीपासून निघतो आहे. यावर्षी ज्ञानोबारायांचा ७५० वा जन्मोत्सव आहे. त्याचे अवचित्य साधून हा सोहळा मार्गस्थ होणार आहे. नेवासा आणि परिसरातील तालुके संभाजीनगर जिल्हा या ठिकाणावरून जवळजवळ एकत्रित ३० ते ४० दिंड्या आणि २५ ते ३० हजार भाविक यामध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे आणि त्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

१९ जूनला या नेवासा क्षेत्रावर प्रस्थान होईल. नेवासा क्षेत्रातच पहिला मुक्काम होणार असून भाविकांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानतर्फे या सोहळ्यामध्ये सहभागी होऊन आनंद लुटावा, असे आवाहन देविदास महाराज यांनी केले.

रामभाऊ महाराज राऊत म्हणाले की, दररोज साधारण वीस किलोमीटरची वाटचाल करत करत अष्टमीला पालखी सोहळा पंढरपूरला पोहचेल आणि नवमीला पंढरपूर क्षेत्रातून नगरप्रदक्षिणा होईल आणि मग आपल्या ठिकाणी सगळे दिंडीवाले थांबतील आणि पांडुरंगाची सेवा करतील अशी ही योजना आहे.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याच्या बैठकीस श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त तसेच सहभागी होणारे दिंडी चालक, वारकरी उपस्थित होते. आभार कैलास जाधव यांनी मानले.

पान १ वरुन

ट्रम्प यांना दुहेरी दणका

कायदेविषयक अधिकार अयोग्यरित्या बहाल करण्यासारखे आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. हा निर्णय ट्रम्प यांच्या 'लिबरेशन डे' टॅरिफ लागू करण्याच्या योजनेसाठी कायदेशीर धक्का मानला जात आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांचे जवळचे मित्र मानले जाणारे टेस्लाचे प्रमुख एलन मस्क यांनी ट्रम्प प्रशासनापासून वेगळे होत असल्याची घोषणा केली. त्यांनी सरकारी नोकरशाही कमी करण्यासाठी आणि सुधारणा करण्यासाठी पुढाकार घेतला होता. पण आता ते डोनाल्ड ट्रम्प यांचे मुख्य सल्लागार म्हणून त्यांची सरकारी जबाबदारी सोडत आहेत. ट्रम्प आणि मस्क यांची मैत्री अखेर तुटली. गेल्या काही दिवसांपासून दोघांमध्ये मतभेद असल्याची चर्चा सुरू होती. आता एलन मस्क यांनी आपला निर्णय जाहीर केला.

११ हजार शेतकऱ्यांची ५ हजार ७०० हेक्टरवरील शेती उद्ध्वस्त

पावसाने हजेरी लावली. त्यात १७१ गावे बाधित झाली आहेत. अहिल्यानगर व पारनेर या तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाने कहर केला. अहिल्यानगर तालुक्यात ४५ गावांतील २ हजार ५५९.१० हेक्टर क्षेत्रातील उन्हाळी बाजरी, कांदा, मिरची, फ्लॉवर, संत्रा, डाळींब, शेवंती, भूईमुग या पिकांचे नुकसान झाले असून ४ हजार १७६ शेतकऱ्यांना त्यांचा फटका बसला आहे. तर पारनेर तालुक्यात ३४ गावांमधील ७५.४ हेक्टर क्षेत्रातील कांदा, टोमॅटो, टरबूज, आंबा, कोबी, मका या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यात १८३ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. तर कर्जत तालुक्यात ३६ गावे बाधित झाली असून २१९.८० हेक्टर क्षेत्रातील कांदा, बाजरी, भाजीपाला, पेरू, भुईमुग, लिंबू, मका, उडीद, टोमॅटो, खरबूज, आंबा या पिकांचे नुकसान झाले आहे. सुमारे ४४० शेतकर्यांना त्याचा फटका बसला आहे. अन्य तालुक्यातील नुकसान पुढीलप्रमाणे आहे. पाथर्डी १ गावे ०.४० हेक्टर क्षेत्र, १ शेतकरी, श्रीगोंदा ३३ गावे, ४६०.५५ हेक्टर क्षेत्र तर ८५८ शेतकरी, जामखेड १० गावे, १५.९ हेक्टर क्षेत्र तर ३५ शेतकरी, राहुरी १५ गावे, १३०.७ हेक्टर क्षेत्र तर ३०५ शेतकरी, नेवासा ५ गावे, ५०.४ हेक्टर क्षेत्र व ८५ शेतकरी, अकोले १ गावे, ०.४० हेक्टर क्षेत्र तर १ शेतकरी आहे. कोपरगाव १ गावे १.७१ हेक्टर क्षेत्र असून १ शेतकरी आहे.

मशागत, पेरणीसाठी उघडीप मिळणार

दोन दिवसापूर्वी पुण्या-मुंबईत पोहोचलेला मान्सून, सध्या त्याच्या वाटचालीत वातावरण अनुकूल असल्यामुळे तो गुरुवारी नगर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली, परभणी जिल्ह्यात तर व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागापर्यंत पोहोचला आहे. पालघर, नाशिक, खान्देश, छत्रपती संभाजी नगर, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्याकडे त्याने अजुन झेप घेतलेली नसल्याचे खुळे यांनी कळवले आहे.

पंचनाम्यासाठी गावनिहाय अधिकारी-कर्मचारी नियुक्त

होणाऱ्या पंचनाम्यात शेतीसह अन्य नुकसानीची आकडेवारीसमोर येणार आहे.

या पावसात अकोळनेर, सारोळा कासार, खडकी, वाळकी, शिराढोण, चिचोंडी पाटील, शिंगवे, मजले चिंचोली, हातवळण, मठपिंप्री, भोयरेपठार, चास, हिवरेझरे, वाकोडी, नेप्ती, भातोडी पारगाव, गुणवडी, भोरवाडी, नालेगाव, दरेवाडी, जाधववाडी, रुईछत्तीसी, बुरूडगाव, वाळूंज, पारगाव मौला, दहिगाव, पारगाव भातोडी, सोनवाडी चार, देऊळगाव सिद्धी, अरणगाव, आंबिलवाडी, भोयरे खुर्द, बाबुर्डी घुमट, घोसपुरी, साकत खुर्द, नारायणडोह, पिंपळगाव कौंडा, वडगाव तांदळी, केडगाव, उक्कडगाव, तांदळी वडगाव, वाटेफळ, गुंडेगाव, टाकळी खातगाव ही ४५ बाधित झाली असून त्यांचे पंचनामे करण्यासाठी गावनिहाय अधिकारी व कर्मचार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नोडल अधिकाऱ्यांनी दररोज पंचनामे केलेल्या गावाची माहिती देण्याचे सांगण्यात आले असून सर्व पंचनामे १ जूनपर्यंत करण्याचे आदेश तहसीलदार शिंदे यांनी दिले आहे. त्यानुसार शेतकरी यादी तयार करून त्यात त्यांचे झालेले नुकसान असा तपशील देण्याचे सांगण्यात आले आहे.

अजितदादा-एकनाथ शिंदे संवादात चांगले नाहीत; मुख्यमंत्र्यांचं वक्तव्य

कार्यक्रमात म्हटले आहे की, शरद पवारांबद्दलच्या अनेक गोष्टी मला आवडतात. पण काही गोष्टी अशाही आहेत, ज्या मी स्वीकारत नाही. पण मी त्यांच्या सातत्याचे कौतुक करतो. या वयातही ते जिंकले, हरले किंवा परिस्थिती कशीही असली तरी काम करत राहतात, असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यापैकी संवादात कोण चांगलं आहे? याबाबत विचारले असता देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे दोघेही संवादात चांगले नाहीत, असे म्हणत त्यांनी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची त्रुटी दाखवली आहे. अर्थात हे दोघे या मताबाबत आपल्याला माफ करतील, असे देखील वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. आता देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शेतकऱ्याने केलेल्या अवयवदानातून दोघांना मिळणार जीवदान

वाचवण्यात यश आले नाही.

त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने तरकसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यामुळ सावरत धीराने त्याचे आई-वडील आणि बहिणीने समाजहिताच्या भावनेने अवयवदानाचा निर्णय घेतला. रुग्णालयातील अवयव प्रत्यारोपण समन्वयकांनी कुटुंबीयांचे समुपदेशन करून संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. संबंधित माहिती झेडटीसीसी, पुणे यांच्याकडे पाठवण्यात आली. त्यानंतर ज्यूपिटर हॉस्पिटल, पुणे येथून आलेल्या तज्ञ डॉक्टरांच्या टीमने प्रवरा रुग्णालयातील मेंदूमृत समिती, प्रशासन, आणि कैलास यांच्या आई-वडील, बहिण तसेच इतर नातेवाईकांच्या सहकार्याने गुरुवारी पहाटे ५ वाजता अवयवदानाची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. कैलास यांच्या दोन किडनी आणि दोन्ही डोळे समाजातील गरजूंना अवयव दान म्हणून मिळाले आहेत. त्यातून चार जणांना जीवदान मिळणार आहेच. पण नेत्रदान केल्याने मृत्यू झालेल्या तरुणाने कैलास हे जग पाहू शकणार आहे. तरुण मुलाचा मृत्यू झाल्यानंतरही तरकसे कुटुंबाने जपलेली सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद असून समाजासाठी प्रेरणादायी आहे.

संगमनेरात गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या दोघांना पकडले

रस्त्यावर दोघे मध्यरात्री एक वाजता संशयास्पदरित्या फिरताना दिसून आले. पथकाने त्यांची विचारपूस करत अंगझडती घेतली असता गावठी पिस्तुल व दोन मोबाईल मिळून आले. याप्रकरणी पोकॉ. रामकिशन मुकरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेख मुज्मील शेख मजिद (वय २२) व जमीरखान नजीरखान (वय ४०, दोघेही रा. ता. खामगाव, जि. बुलढाणा) यांच्याविरुद्ध शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. या कारवाईत ५० हजार रुपयांचे गावठी पिस्तुल व अकरा हजार रुपयांचे दोन मोबाईल असा एकूण ६१ हजार रुपयांचा मोबाईल जप्त केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक विश्वास भान्सी हे करत आहे. दरम्यान, दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता ३१ तारखेपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.